

एल्विस प्रिस्ले

महान गायक



एल्विस प्रिस्ले




एल्व्हिस अरॉन प्रिस्ले म्हणजे रॉक अँड रोल, ताल, ब्लूज, कंट्री म्युझिक या सगळ्या गोष्टींमधून एक वेगळीच दिशा देणारा संगीताचा बादशहा. तरुण मुलांना आपलं वाटेल असं संगीत निर्माण करणारा तो पहिलाच.


एल्व्हिस प्रिस्ले ८ जानेवारी १९३५ रोजी ट्युपेलो, मिसिसिपीमध्ये जन्माला आला. त्याचे पालक व्हर्नॉन आणि ग्लॅडिस प्रिस्ले दोन खोल्यांच्या छोट्या घरात रहात होते.
व्हर्नॉन प्रिस्ले मिळेल ते काम करायचा. पिकांची कापणी, दुधाचे ट्रक वाहून नेणं किंवा लाकूड तोडणं.
ग्लॅडिसनं त्याच्यात नम्रपणा, दयाळूपणा असे गुण रुजवले. ती जिथे जाईल तिथे एल्व्हिसला घेऊन जायची. व्हर्नॉननं त्याला लोकांच्या दादागिरीपासून वाचायला शिकवलं.
मला त्या धर्मगुरुचं ओरडणं, टाळ्या वाजवणं, उत्तेजित होणं आवडतं.
हे घे तुझं पाच डॉलर्सचं बक्षीस आणि इथले खेळ तुला फ्री आहेत.
एल्व्हिस १० वर्षांचा असताना मुख्याध्यापकांनी त्याला मिसिसिपी-अलाबामामधल्या जत्रेत नेलं होतं. ओल्ड शेप हे गाणं गायल्याबद्दल तिथे एल्व्हिसला दुसरा क्रमांक मिळाला.
एल्व्हिस रेडिओवर कंट्री म्युझिक आणि ब्लूज ऐकायचा. त्यांच्या गाण्याची तो हुबेहूब नक्कल करायचा. खरं तर तो गाणं शिकला नव्हता. पण त्याचा कान संगीत ऐकण्यात तरबेज होता.
प्लीज सर, मला बाईक हवी आहे.
सॉरी, ती फार महाग आहे..
तुला आपण गिटार घेऊ. ती गाताना उपयोगी पडेल.


आधी ते एक बेडरुमच्या छोट्या घरात रहात होते. नंतर ते जरा साध्या वस्तीतल्या दोन बेडरुमच्या घरात रहायला गेले.
अरे, इथे काही काम मिळत नाही. मेंफिस, टेनेसीमध्ये तरी काम मिळेल असं वाटतंय.
व्हर्नॉनला रंगांचे डबे भरण्याचं काम एका तासाला ८३ सेंटस या दरानं मिळालं. ग्लॅडिस पडदे तयार करणार्‍या कारखान्यात कामाला जायची.
एल्व्हिस ज्या शाळेत होता तिथे १६०० विद्यार्थी होते. इस्ट ट्युपेलोमधल्या एकूण लोकसंख्येपेक्षा ती संख्या जास्त होती. तिथे त्याला काही चांगले मित्र मिळाले. त्याला फूटबॉल आणि खरेदी करणं आवडायचं.
तो फूटबॉलमध्ये निष्णातही होता.
इथली मुलं तुझे केस आणि भडक कपडे यांची चेष्टा करतात, एल्व्हिस
मला त्याची पर्वा नाही. मी जरा त्यामुळे मोठा दिसतो हे महत्वाचं.
एल्व्हिसला मित्रांच्या मेळाव्यात गाणं गायला आवडायचं. माध्यमिक शाळेत त्याच्या शिक्षकांनी स्नेहसंमेलनात गायला सांगितलं. विद्यार्थ्यांना त्याचं गाणं खूप आवडलं.
त्याला परत परत गायला लोकांनी भाग पाडलं. ३० मुलांमध्ये तो सर्वोत्कृष्ट ठरला .


शाळेत असताना एल्व्हिस काही कामंही करायचा. पण त्याच्या अभ्यासात अडथळा येतो असं पालकांना वाटत होतं. आर्थिक चणचण असली तरी त्याच्या पालकांनी कायम त्याला हातखर्चाला पैसे पुरवले.
मला ही नोकरी आवडते. मला इथे रेडिओ वर संगीत ऐकता येतं.
शाळेतलं शिक्षण संपल्यावर एल्व्हिसला ट्रक ड्रायव्हरची नोकरी मिळाली. एका तासाचे १.२५ डॉलर्स मिळायचे. रात्री तो इलेक्ट्रिशियनचा कोर्स करायचा.



तू नशीबवान आहेस. तुझ्या लांब केसांवर जाऊ नका, तो चांगला मुलगा आहे असं नोकरी देणार्‍या संस्थेनं सांगितलं. इथली माणसं तुला चिडवतात, कारण त्यांना तू आवडतोस. तुला त्यांनी स्काय हुक्स पहायला स्वत:च पाठवलं होतं, लक्षात आहे ना?
ऐसा कुछ नहीं हैहं. ठीक आहे. मलाही ते सगळे आवडतात.



मॅडम, मला माझ्या आईसाठी एक रेकॉर्ड करायची आहे.
१९५३ साली एल्व्हिस प्रिस्लेनं मेंफिस रेकॉर्डिंग सर्व्हिसला आपल्या आईसाठी एक रेकॉर्ड करण्याचे ४ डॉलर्स दिले. 'माय हॅपीनेस' आणि 'दॅटस व्हेन युअर हार्टएक बिगिन्स 'ही दोन गाणी तो गायला.



एकदा तो मुलगा गायला लागल्यावर तू ऐकायला हवंस. सॅम, मी रेकॉर्ड टेप केली आहे.
होय. तो वेगळा आहे. पण त्याला काम मिळायला हवं.
एल्व्हिस दुसरी रेकॉर्ड करायला परत आला.
सॅमनं त्याची ओळख स्कॉटी मूर या गिटार वादकाशी, बिल ब्लॅक या बास वादकाशी करुन दिली. त्या तिघांनी अनेक महिने एकत्र सराव केला. त्यांना स्वत:च्या भन्नाट शैलीतलं संगीत निर्माण करायचं होतं.
हे तुम्ही काय भयंकर केलंय
मला वाटतं, आम्हाला वेगळं काही तरी गवसलं
सॅमनं आपल्या ग्रुपनं तयार केलेली पहिली रेकॉर्ड डेवे फिलिप्स या रेडिओ जॉकीला दिली. रेडिओचे श्रोते तीच रेकॉर्ड वारंवार लावण्याचा आग्रह करायला लागले.
मी ती रेकॉर्ड ओळीनं चौदाव्यांदा लावली आहे.
एल्व्हिसनं आपल्या आईवडिलांसाठी रेडिओ लावला. आपला आवाज ऐकण्याची भीती वाटून तो चित्रपट पहायला निघून गेला.
एल्व्हिस, स्कॉटी आणि बिल यांची ती रेकॉर्ड तुफान गाजली. दॅटस आॅल राईट (ममा) या ब्लूज प्रकारातल्या गाण्यानं कंट्री हा प्रकार देशभर पोचवला.
या गाण्याच्या रेकॉर्डच्या मागच्या बाजूला 'ब्लू मून आॅफ केंटुकी' हे ब्लूज प्रकारातलं गाणं होतं. कंट्री म्युझिक आणि ब्लूज या दोन प्रकारांच्या फ्यूजनचा तो पहिलाच प्रयोग होता. या प्रकाराला नंतर 'रॉकाबिली 'हे नाव प्रचलित झालं.



नॅशव्हिलेच्या ग्रॅंड ओले ऑप्रीमध्ये गायला मिळावं हे प्रत्येक अमेरिकन गायकाचं स्वप्न असतं. एल्व्हिसला त्याच्या पहिल्या रेकॉर्डनंतर ती संधी मिळाली.. पण
मुला, तू परत ट्रक ड्रायव्हिंग कर
एल्व्हिस तेव्हा खूप निराश झाला. कपड्यांनी भरलेली एक सूटकेस विसरुन तो तिथून बाहेर पडला.
ऑक्टोबर १९५४ मध्ये रेडिओवर दुसरं बुकिंग झालं. ते लुईझियाना हेराईड बरोबर होतं. ते आधीच्या गाण्यापेक्षाही लोकप्रिय झालं.
तो ग्रेट आहे. आपण त्याच्याबरोबर एका वर्षाचा करार करु.
ते ३५०० लोकं मावतील इतकं मोठं सभागृह शनिवारी रात्री एल्व्हिसच्या प्रतीक्षेत भरुन गेलेलं असायचं.
TENNESSEE
ALABAMA
GEORGIA
MISSISSIPPI
TEXAS
LOUISIANA
मी यासाठी ट्रक ड्रायव्हिंग सोडलं? मोटारगाडीत झोपण्यासाठी?
हं.. तू आणि बिली दोघांकडेही स्वत:च्या मोटारगाड्या नाहीत. माझ्या बायकोनं याचे हप्ते भरेपर्यंत ही कार टिकावी अशी इच्छा आहे.
ग्रुप ब्लू मून बॉईज या नावानं ओळखला जात होता. बॉब नील हा मॅनेजर गावांतल्या शाळांच्या सभागृहांमध्ये आठवड्याला ३/४ कार्यक्रमांचं बुकिंग करायचा.
एल्व्हिस लोकप्रियतेच्या शिड्या चढत होता. बिलबोर्ड या रेकॉर्डसच्या मासिकानं त्याची दखल घेतली.
त्याची गाण्याची शैली आणि खूप गाजलेली नृत्यशैली दिवसेंदिवस जास्तीत जास्त लोकांना मोह घालत होती.



कर्नल
१९५५ साली कर्नल टॉम पार्कर हे एक प्रख्यात व्यक्तिमत्व होतं. टॉम पार्करच्या मदतीशिवाय एल्व्हिस प्रिस्ले इतका बडा स्टार कधीच होऊ शकला नसता.
टॉम पार्कर १९१० साली जन्माला आला.
धंदा कसा चाललाय, टॉम?
फुलहाऊस.. मस्त चाललाय.
वयाच्या १७व्या वर्षी तो तट्टू आणि माकड हा कार्यक्रम सादर करायचा.
अनेक संगीतमेळाव्यांबरोबर फिरत त्यानं पडेल ती कामं केली होती.
पहा.. किती सुंदर कॅनरीज आहेत..
तो चांगला सेल्समन होता पण प्रामाणिक नव्हता. एकदा त्यानं चिमण्यांना पिवळा रंग देऊन त्या कॅनरीज म्हणून विकल्या होत्या. हॉट डॉग्ज निम्मे करुन बनपावात तो खुबीनं बसवायचा आणि फूट लाँग हॉट डॉग्ज म्हणून विकायचा.
तो संगीतमेळावे, सर्कस अशा ठिकाणी एजंट म्हणून काम करायचा. नंतर तो कंट्री गायक एडी अर्नॉल्ड आणि हँक शो यांचा मॅनेजर झाला. गायक, वादक आणि कॉमेडियन्स यांच्याबरोबरचे कार्यक्रम तो आयोजित करायचा.
ओके.. हॉट प्लेट प्लग लावून सुरु कर.
कर्नल पार्करकडे लाईव्हस्टॉक एक्झिबिट म्हणून कायम जिवंत कोंबड्या असायचा. त्यामुळे त्याला त्याच्या कार्यक्रमासाठी कर भरावा लागायचा नाही.
एकदा, एडी अर्नॉल्डला गाताना त्रास व्हायला लागला. तेव्हा कर्नलनं त्याचे लाडके डान्सिंग चिकन्स बाहेर काढले. विजेचा प्रवाह चालू असताना त्यानं फसवून त्या कोंबड्यांना हॉट प्लेटवर जायला भाग पाडलं.


१९६५ च्या अखेरीस एल्व्हिस, त्याच्या रेकॉर्डस आणि त्याचे कार्यक्रम यातून आठवड्याला २००० डॉलर्स मिळवत होता. त्यानं गुलाबी रंगाची कॅडिलॅक गाडी घेतली आणि मेंफिसमध्ये आपल्या आईवडिलांसाठी ४०००० डॉलर्सचं घर घेतलं.
तो मुलगा मला आवडतो.. मी त्याची बुकिंग्ज मिळवायला मदत करेन.
हँक स्नो जांबोरी या कार्यक्रमाच्या दरम्यान कर्नल पार्कर एल्व्हिसला भेटले. हँक स्नो हा लोकप्रिय कंट्री गायक होता. त्याचे कार्यक्रम कर्नल ठरवायचा.
मी तुमच्या मुलाला मदत करु शकेन.
एल्व्हिचा खाजगी मॅनेजर होण्यासाठी कर्नलनं व्हर्नॉन आणि ग्लॅडिस प्रिस्ले यांच्याशी मैत्री केली.
१९५५ च्या नोव्हेंबरमध्ये एल्व्हिसचा मॅनेजर बॉब नील यानं कर्नल पार्करनं नवीन मॅनेजर व्हावं हे मंजूर केलं.
१९५६ हे एल्व्हिसचं वर्ष ठरलं. कर्नलच्या मार्गदर्शनाखाली त्याची लोकप्रियता कळसाला पोचली. तो टीव्हीवरही झळकला.
त्याला डॉर्सी ब्रदर्स स्टेज शो मधून १२५० डॉलर्स मिळाले. टीव्हीच्या प्रेक्षकांनी एल्व्हिससारखं चैतन्य कधीच अनुभवलं नव्हतं.
तू कॅमेऱ्यासमोर येशील असं बघत जा..
तो मिल्टन बर्ले या गायकाबरोबर दोनदा झळकला आणि त्या कार्यक्रमांचे त्याला प्रत्येकी ५००० डॉलर्स मिळाले.
वसंतऋतूमध्ये तो स्टीव्ह ॲलन शोमध्ये झळकला. त्याचे त्याला ७५०० डॉलर्स मिळाले. पण तिथे त्यानं टक्सेडो घालून शांत उभं राहून गाणं गायलं. प्रेक्षकांना ते अजिबात आवडलं नाही.
एड सुलिव्हन शोसाठी त्याला ५००० डॉलर्स मिळाले. तेव्हा तो टीव्हीवरचा गाजलेला शो होता.
पण एल्व्हिसच्या जलद हालचालींच्या भडिमारानं कॅमेऱ्यासमोर त्याचा फक्त कमरेच्या वरचा भागच दिसला.


कर्नलनं आरसीए रेकॉर्डबरोबर करार केला. सॅम फिलिप्सचा त्यांच्याबरोबरचा करार ३५००० डॉलर्सचा होता. एल्व्हिसला बोनस म्हणून ५००० डॉलर्स मिळाले.
हार्टब्रेक हॉटेल या गाण्यापासून एल्व्हिसच्या रेकॉर्डस धडाकेबाजपणे येत गेल्या. त्या सगळ्या पहिल्या क्रमांकावर गाजत होत्या.
1956
HOUND DOG
DON'T BE CRUEL
TUTTI FRUTTI
MONEY HONEY
SHAKE, RATTLE, AND ROLL
LOVE ME TENDER
BLUE SUEDE SHOE
1957
ALL SHOOK UP
TEDDY BEAR
LOVING YOU
JAILHOUSE ROCK
पॉप म्युझिक त्यानंतर इतकं लोकप्रिय कधीच झालं नाही. १९५०च्या दशकात एल्व्हिसच्या नावावर जितक्या गोल्ड रेकॉर्डस होत्या तितक्या इतर गायकांच्या संपूर्ण करिअरमध्ये मिळून सुध्दा नव्हत्या.


कर्नल पार्करनं २०एथ सेंच्युरी फॉक्सबरोबर एल्व्हिसच्या तीन चित्रपटांसाठी ४,५०,००० डॉलर्सचा करार केला.
लव्ह मी टेंडर हा त्यातला एल्व्हिसचा पहिला चित्रपट. त्याच्यावर समीक्षकांनी चिक्कार टीका केली. पण हॉलिवूडमध्ये तो गाजला. चित्रपट निर्मितीचा खर्च चित्रपट प्रदर्शित झाल्यावर अवघ्या तीन दिवसात वसूल झाला.
LOVE ME TENDER
LOVING YOU
Jailhouse Rock
त्याचे पुढचे दोन चित्रपटदेखील खूप गाजले. त्याचे चाहते रोज हजारोंच्या संख्येनं वाढत होते.


लव्ह मी टेंडर या चित्रपटाचं शूटिंग संपल्यावर कर्नलनं एल्व्हिससाठी निरनिराळ्या देशांचा दौरा आयोजित केला. एका कार्यक्रमाचे २५००० डॉलर्स या दरानं एल्व्हिसचे मोठमोठ्या शहरांमध्ये कार्यक्रम ठरले. १९५७ साली तो चित्रपटाचं शूटिंग आणि कंट्री म्युझिकच्या कार्यक्रमांचे दौरे करत होता.
अजूनही प्रत्येक कार्यक्रमाआधी त्याला परफॉर्मन्स अँक्झायटी जाणवायची.
पण गायला सुरुवात केल्यावर लगेच तो स्टेजवर चाहत्यांसाठी तो एक जादुई दुनिया उभी करायचा.
जिथे जाईल तिथे त्याच्या नावानं आरोळ्या ठोकणारी गर्दी असायची. विशेषत: टीनएजर्स मुलींची संख्या जास्त होती.
ELVIS PRESLEY DAY
एल्व्हिस नम्रआणि क्षमाशीलहोता.
कार्यक्रमाचा चेक ट्युपेलोच्या कार्यक्रमाला देतो आहे.
ओल्ड शेपमध्ये दुसरं बक्षीस मिळवल्यावर आणि मिसिसिपी अलाबामा फेअर / डेअरी शोज मध्ये झळकल्यावर दहा वर्षांनी एल्व्हिस तिथे परतला.
लेडीज अँड जंटलमेन, संधीचा लाभ घ्या. एल्व्हिसबरोबर फोटो चे ५० सेंटस..
कर्नल फक्त संगीतजलशाच्या ठिकाणी त्याचे फोटो विकत नव्हता तर त्यानं एल्व्हिस प्रिस्ले ही इंडस्ट्री चालू केली. विकलेल्या प्रत्येक वस्तूमुळे एल्व्हिसला आणि कर्नलला जास्त पैसे मिळत होते. टी शर्टस, जॅकेस, ब्रेसलेटस, टेडी बेअर्स, लिपस्टिक, चित्रं काढायची पुस्तकं, पोस्टर्स..


१९५६ साली एल्व्हिसनं १० मिलियन डॉलर्स कमावले. १९५७ ही त्याच्यासाठी महत्वाचं वर्ष ठरलं.
१९५७ साली त्यानं मेंफिसजवळ १३ एकरांची ग्रेसलँड ही इस्टेट विकत घेतली. त्यात २३ खोल्या होत्या. स्विमिंग पूलबरोबर एक फन रुम होती. पूल टेबल, सोडा फाऊंटन, चित्रपट पहाण्यासाठी प्रोजेक्टर आणि दोन टीव्ही संच होते. तो कपडे, दागिने, लिंकन / कॅडिलॅक / रोल्स रॉईस असा गाड्या, ट्रक्स आणि मोटारसायकल्स घेत होता.
तू चर्चमधलं संगीत खूप छान गातोस. मला ते खूप आवडतं.
एल्व्हिसचं आपल्या आईवडिलांवर प्रेम होतं. ते ग्रेसलँडवर त्याच्याबरोबर रहायचे. त्याची आजी, एक काकू, दोन काका आणि मेंफिस माफिया हा मित्रपरिवार सगळेच त्याच्यासोबत रहात होते.
सार्वजनिक ठिकाणी त्याच्याभोवती टीनएजर्स मुलींचा घोळका कायम असायचा. त्याचे जवळचे मित्र आणि काही बॉडीगार्डस सोबतअसायचे.
तुम्हाला ते मेंफिस माफिया का म्हणतात?
कोणत्यातरी वर्तमानपत्रानं आम्हाला ते नाव दिलं. ते आम्हाला चिकटलं. आम्ही एल्व्हिसकडे नोकरीवर आहोत. त्याची बिलं, कपडे, प्रवासदौरे आम्ही सांभाळतो. फॅन्सची त्याचा छळ करु नये याचीही आम्ही काळजी घेतो.
ॲम्युझमेंट पार्क, रोलर स्केटिंग रिंक किंवा चित्रपट थिएटर स्वतंत्रपणे संपूर्ण बुक केल्याखेरीज एल्व्हिसला तिथे जाणं शक्यच नव्हतं. मग असं बुकिंग करुन तो आणि त्याचा ग्रुप काही मित्रांना बोलावून एंजॉय करायचे.


सेना
२४ मार्च १९५८ रोजी सकाळी ६.३५ वाजता एल्व्हिस, त्याचे पालक आणि काही मित्र मेंफिसच्या ऑफिसमध्ये गेले. एल्व्हिस प्रिस्ले लष्करात भरती झाला.
कर्नल आणि पत्रकार, चित्रपटाची जाहिरात करणारे आकाशात सोडलेले फुगे असा जामानिमा हजर होता.
एल्व्हिस लष्करात असला तरी त्याचा कोणाला विसर पडणं शक्य नव्हतं. त्याचा किंग क्रिआॅल हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार होता.
अर्कानसार, फोर्ट शॅफीला जाणारी बस एका रेस्टॉरंटमध्ये थांबली. शेकडो चाहते तिथे घुसले आणि त्यांनी पार एल्व्हिसचे कपडे फाडले.
मी त्याला खायला घातलं
मी प्रथम पकडलं.
हे केस त्याच्या चाहत्यांना विकून किती पैसे मिळतील तुला ठाऊक आहे?
आज केस आहेत. काल नव्हते
फोर्ट शॅफी या ठिकाणी पत्रकारांना आणायला कर्नल पार्करला परवानगी मिळाली होती.


एल्व्हिस टेक्सास, फोर्ड हुड या ठिकाणी युध्दाचे धडे घ्यायला गेला.
आठवड्याला त्याला २००० पत्रं यायची. पण प्रायव्हेट प्रिस्ली हा सैनिक बनला होता.
तिथल्या लेफ्टनंटनं वार्ताहरांना आता पोस्टवर जाऊन एल्व्हिसला भेटता येणार नाही असं ठामपणे सांगितलं.
मार्च.. मार्च. मार्च
वीकएंडला मात्र चाहत्यांना त्यानं चकवलं. त्याच्याबरोबरचे सैनिक त्याची मस्करी करायचे तेव्हा त्याला हसू यायचं.
सैन्यात असेपर्यंत सावर्जनिक ठिकाणं त्यानं टाळली.
कळलं का? एल्व्हिस प्रिस्ले अभिनय करु शकतो. न्यूयॉर्क टाईम्समध्ये बातमी होती.
तो मेंफिसमध्ये सुट्टीवर असताना किंग क्रिऑल प्रदर्शित झाला. समीक्षकांना तो आवडला.
ऑगस्टमध्ये एल्व्हिसच्या आयुष्यात धक्कादायक घटना घडली. त्याची प्रेमळ आई तिच्या वयाच्या ४६व्या वर्षीच मरण पावली.
एल्व्हिससाठी ती केवळ आई नव्हती. त्याची जिवाभावाची मैत्रीणही होती.


१९५८च्या सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस लष्करानं एल्व्हिला जर्मनीला पाठवलं. तो फ्रॅंकफर्टजवळ फ्राईडबर्गला गेला.
रॉक अँड रोल प्रकार जर्मनीत तेव्हा गाजत होता.
जर्मनीत शेकडो टीनएजर्स चाहत्यांना एल्व्हिसपासून दूर रोखावं लागलं.
महिन्याला ८०० डॉलर्स भाडं आहे. दुरुस्ती लागली तर तू करायचीस.
वर्तमानपत्रांमध्ये प्रिस्लेच्या प्रासादतुल्य घराबद्दल कायम छापून येत होतं. पण एल्व्हिस मात्र सैन्यात काम करत असताना एका साध्या घरात वडिल आणि आजीबरोबर रहात होता.
तुला नकाशे वाचून, रेखाटनं काढावी लागतील. शत्रू कुठे लपला आहे ते शोधावं लागेल.
एल्व्हिस सैनिक म्हणून इतरांच्या आदराला पात्र ठरला. सहकारी त्याला चाहत्यांपासून वाचवायचे.
इस्ट जर्मनीमध्ये जर्मन लोकांनी एक टोळी पकडली त्या टोळीचं नाव एल्व्हिस प्रिस्ले हाऊंड डॉग्ज असं आहे.
एल्व्हिस इतर सैनिकांपेक्षा वेगळा होता. त्याला आठवड्याला १०००० पत्रं यायची. त्यातली बरीचशी कर्नलकडे रवाना व्हायची.
एल्व्हिस आणि त्याचे वडील व्हर्नॉन दोघांचीही आपापल्या भावी पत्नींबरोबर जर्मनीत भेट झाली. प्रिस्किला ब्युलियू आणि डावाडा स्टॅनली. एका हवाईदळाच्या कप्तानाची मुलगी असलेली प्रिस्किला एल्व्हिसला भेटली तेव्हा फक्त १४ वर्षांची होती.



सार्जंट एल्व्हिस प्रिस्ले सन्मानानं मार्च १९६० मध्ये सैन्यातून निवृत्त झाला. जर्मनीतून न्यू जर्सीला जाणार्‍या विमानात तो बसला. न्यू जर्सीला तो सकाळी ६.३५ ला पोचला तेव्हा वादळी बर्फवृष्टी होत असतानाही तिथे त्याचे मित्र, कर्नल आणि शेकडो चाहते उपस्थित होते.
तुला कर्तव्यदक्षतेबद्दल अॅचिव्हमेंटचं सर्टिफिकेट मिळालंय असं कळलं.
फ्रँक सिनात्राची मुलगी नॅन्सी हिनं एल्व्हिसला आपल्या वडिलांनी पाठवलेले शर्टस भेट दिले.
एल्व्हिस सैन्यात असताना अनेकांनी त्याची स्टाईल अंगिकारली.
एका टीव्ही कार्यक्रमात फिल सिल्व्हर्स यानं यु आर नथिंग बट अ रॅकून आणि ब्राऊन कॉबॅट बूटस ही गाणी सादर केली.
NOW SH
BYE BYE BIRDIE
"रॉक अँड रोल गायक बर्डी याचा बाय बाय बर्डी हा कार्यक्रम ब्रॉडवेवर दोन वर्षं सादर होत होता.
एल्व्हिसचं नाव जनमानसासमोर सतत राहील याची कर्नलनं पुरेपूर काळजी घेतली होती.
एल्व्हिसनं १९५८ साली दोन मिलियन डॉलर्स कमावले आणि १९५९ मध्ये तर त्याहीपेक्षा त्याचं उत्पन्न जास्त होतं.
A BIG HUNK O' LOVE
MY WISH COME TRUE
A DATE WITH ELVIS
KING CREOLE
ELVIS
I LOVE ELVIS
ELVIS WE LOVE YOU

वरुन खाली आणि खालून वर






१९६२ ते१९६९ पर्यंत एल्व्हिसची कोणतीच गाणी पहिल्या क्रमांकावर नव्हती.
ELVIS lovin'
ELVIS
ELVIS PRESLEY ...in two roles for the first time!
KISSIN' COUSINS
चित्रपटांमधून पैसे मिळत होते ते कर्नलच्या लक्षात आलं. पण एल्व्हिसचं गाण्याचं आणि अभिनयाचं कौशल्य तिथे वापरलं जात नव्हतं.
किसिंग कझिन्स हा चित्रपट पैसे वाचवण्यासाठी १७ दिवसात तयार झाला. क्विकी मूव्हीज प्रकारातले हे चित्रपट सदोष असायचे.
सार्वजनिक ठिकाणी आपल्याभोवती गर्दी जमते हे ठाऊक असलेला एल्व्हिस सतत मेंफिस माफिया घेऊनच हिंडायचा. ते त्याचे लहानपणापासूनचे दोस्त होते. काही सैन्यातल्या काळातही मित्र झाले होते.
एल्व्हिसकडे कामाला तरुण किती आहेत?
कधी सात तर कधी १२ सुध्दा
ते फूटबॉल खेळत, पोहायला जात, मोटारसायकलवर यथेच्छ भ्रमंती करत. तो नम्र, उदार होता आणि धमाल करायचा असं त्याचे मित्र सांगतात.
तुम्हाला एल्व्हिसबद्दल नक्की काय वाटतं?
त्याच्यावर आमचं मोठ्या भावासारखं प्रेम आहे. तो आमच्यावर कधीकधी रागावला तरी आनंदात असावा यासाठी आम्ही धडपडतो. त्याला कधी कधी निराश वाटतं, पण आम्ही ते समजून घेतो.


१९६० साली प्रिस्किला ब्युलियू जर्मनीहून एल्व्हिस, त्याचे वडील व्हर्नॉन आणि सावत्र आई डी यांच्याबरोबर ख्रिसमस साजरा करायला आली.
मागच्यावर्षी सैन्यात होतास त्यापेक्षा आत्ताचा हा ख्रिसमस खरंच चांगला आहे. डॅडनी तुझ्याशी लग्न केलेलं मला खूप आवडलंय बरं का, डी.
प्रिस्किलाच्या वडिलांच्या सांगण्यानुसार ती ग्रेसलँडवर व्हर्नॉन, डी, एल्व्हिसची आजी आणि काकू यांच्याबरोबर रहायला लागली.
तिचं शाळेतलं शिक्षण १९६३ साली संपल्यावर ती मॉडेलिंग शिकायला गेली.
तुझ्यासमोर, खरा हॉलिवूड बॉय उभा आहे.
हा! हा!
एल्व्हिसचा सगळा वेळ हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करण्यात गेला.
IS ELVIS MARRIED?
ELVIS
WHY ELVIS and I CAN'T MARRY
अनेक वर्षं वर्तमानपत्रांमधलं आणि चित्रपटविषयक मासिकांमधलं गॉसिप एल्व्हिसचं नाव कोणत्या ना कोणत्या स्टार अभिनेत्रीशी जोडत असायचे.



पण, १ मे १९६७ रोजी एल्व्हिस प्रिस्लेनं लास व्हेगासमध्ये प्रिस्किला ब्युलियूसोबत लग्न केलं.
विवाहसमारंभ अगदी घरगुती, घरातल्या लोकांच्या साक्षीनं झाला. पण कर्नलनं प्रेससाठी रिसेप्शन मात्र जंगी केलं.
एल्व्हिस आणि प्रिस्किला मेंफिस मफियाला सोबत न घेता ग्रेसलँडजवळच्या १६३ एकरांच्या फार्महाऊसवर घालवत होते.
हे सोडून हॉलिवूडमध्ये जाऊन काम करणं जिवावर आलंय.
त्यांची मुलगी, लिसा मारी १ फेब्रुवारी १९६८ रोजी जन्मली. एल्व्हिस कधीच इतका आनंदी नव्हता.
जगभरातून त्याला तेव्हा फोन येत होते.
चाहत्यांना दूर ठेवायला गार्डस सदोदित काम करत होते.
पण एल्व्हिस वैवाहिक आयुष्यात यशस्वी ठरला नाही. १९७२ मध्ये प्रिस्किला मुलीला घेऊन त्याला सोडून गेली. मेंफिस माफिया त्याच्या आयुष्यात परतला.


एल्व्हिसनं १९६२ ते १९६९ पर्यंत जाहीर कार्यक्रम केले नाहीत. त्याचे अनेक चाहते आता तरुण गायकांकडे वळले होते – बॉब डिलन, बीटल्स, रोलिंग स्टोन, जेफरसन एअरप्लेन. इ
मला अजून एल्व्हिस आवडतो.
मी बीटल्सचा फॅन आहे.
BEATLES
ELVIS
ELVIS in CLAMB
किती भन्नाट आहे हे
मला त्याच्या चित्रपटांचा कंटाळा आलाय. सगळे एकसारखेच असतात.
डिसेंबर १९६९ मध्ये एल्व्हिसनं टीव्हीवर एक खास कार्यक्रम सादर केला.
एनबीसी या चॅनेलवरचा तो कार्यक्रम प्रचंड गाजला.
इफ आय कॅन ड्रीम हे गाणं तर भराभर लोकप्रिय होईल यात शंकाच नाही.
१९६९च्या जुलैमध्ये एल्व्हिस लास व्हेगासच्या इंटरनॅशनल हॉटेलमध्ये पोचला. जगभरातले त्याचे चाहते तिथे जमले होते. तो परत एकदा टॉपवर होता.
मी इंग्लंडहून आलोय.
मी त्याहून दूरवरुन, ऑस्ट्रेलियाहून आलोय.
त्यानंतर एल्व्हिस लास व्हेगासमध्ये हिवाळ्यात एक महिना आणि उन्हाळ्यात एक महिना असा जायचा. प्रत्येक महिन्यासाठी त्याला १ मिलियन डॉलर्स मिळत होते. ह्यूस्टनमध्येही तो एका कार्यक्रमाचे १ मिलियन डॉलर्स घ्यायचा.


१९७० मध्ये लास व्हेगास, ह्यूस्टन ॲस्ट्रोडोम आणि मॅडिसन स्क्वेअर गार्डन या ठिकाणी त्याचे कार्यक्रम यशस्वी झाले खरे, पण त्याच्या समस्या सुरु झाल्या.
प्रिस्किलाला त्यानं भरपूर पैसे दिले.
१९७३ साली एल्व्हिस आणि प्रिस्किला यांचा घटस्फोट झाला.
त्याचे पांढरे केस आता तो कलप लावून काळे करत होता.
त्याला वजनाच्याही समस्या होत्या. तो लठ्ठ होत चालला होता. आपले फोटो काढायलाही तो अनेकदा नकार देत असे.
एल्व्हिस थकला होता. त्याला कार्यक्रम सादर करायला आवडत होतं. आता ते एक अवघड काम होऊन बसलं होतं.
त्याला प्रकृतीच्या अनेक तक्रारी होत्या. तो धूम्रपान किंवा मद्यपान करत नव्हता. पण खाण्यावर त्याचं नियंत्रण नव्हतं.
१६ ऑगस्ट १९७७ रोजी एल्व्हिस प्रिस्ले हृदयविकाराच्या झटक्यानं मरण पावला. तेव्हा तो ४२ वर्षांचा होता.
NEWS
The King Is Dead
BULLETIN
ELVIS DIES


प्रसिद्ध व्यक्ति
काहीतरी चुकतंय. दरवेळी मी नवीन काहीतरी केल्यानंतर एल्व्हिस मला फुलांची गिटार पाठवायचा. यावेळेला ती आली नाही.
ॲन मागरिटनं एल्व्हिससोबत एक चित्रपट काढला होता. त्याच्या मृत्यूबद्दल ऐकल्यानंतर लास व्हेगासमधल्या कार्यक्रमात ती त्याच्याबद्दल भरभरुन बोलली.
SINATRA SHOW
आज आपण एक चांगला मित्र गमावला आहे.
सिनात्रानं आपली एक मैफिल एल्व्हिसला अर्पण केली. स्टेजवरच्या सर्व कलाकारांनी त्याला श्रध्दांजली वाहिली.
मेंफिसनं ध्वज अर्ध्यावर उतरवला. टेलिफोन यंत्रणेला न झेपण्याइतके जगभरातून फोन कॉल्स आले.
कार्टर या राष्ट्राध्यक्षांनी एल्व्हिसला देशाच्या चैतन्याचं आणि बंडखोरीचं प्रतीक असं संबोधलं. त्याच्या नर्मविनोदी स्वभावाचं कौतुक केलं.
ग्रेसलँडमध्ये लाखो चाहते त्याला शेवटचा निरोप द्यायला जमले होते. देशानं त्याच्या मृत्यूचा शोक केला.


एल्व्हिस राजा होता. इतर अनेक सुप्रसिध्द व्यक्तींप्रमाणेच त्याच्याबद्दल बरंच गॉसिपिंग झालं.
ELVIS was REALLY SAD and LONE
TRIBUNE
ELVIS DIDN'T DRINK BUT...
BULLETIN
ELVIS WHAT HAPPENED?
NEWS
THE ELVIS STORY
वर्तमानपत्रांमधल्या त्याच्याबद्दलच्या बातम्या सत्यावर आधारित नव्हत्या असंही काहीवेळा घडलं.
त्याच्या शवाच्या मेडिकल तपासणीत ड्रग्ज वापरल्याची लक्षणं सापडली नाहीत.
त्याची जिंजर एल्डनबरोबर एंगेजमेंट झाली होती. तो आनंदात होता.
मृत्यूसमयी, एल्व्हिसच्या रेकॉर्डस लोकप्रिय होत्या. त्याच्या ठरलेल्या दौर्‍याची तिकिटं आधीच बुक झालेली होती.
तो आनंदात होता. त्याला चांगल्या वस्तू विशेषत: मोटारगाड्या आवडायच्या.
मित्र, कुटुंबिय, सेवाभावी संस्थांना तो सढळ हातानं मदत करायचा.


एल्व्हिसनं ३३ चित्रपटांमध्ये काम केलं. त्याच्या ४५ रेकॉर्डसची प्रत्येकी १ मिलियनपेक्षा जास्त विक्री झालेली होती. मजुराचा मुलगा असलेला एल्व्हिस करोडो डॉलर्सची संपत्ती मागे ठेवून गेला.
ELVIS
अमेरिकन पॉप संगीताची दिशाच त्यानं बदलली. एल्व्हिस प्रिस्ले हा नि:संशयपणे अमेरिकन लीजंड होता.

समाप्त